# शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,

१७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, लाल देवळासमोर, पुणे ४११ ००१
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७
ई मेल आय डी क्र. dydpune @ gmail.com वेब साईट- www.dydepune .com

जा.क्र.शिउसं/प्राथ-२/स्थलांतर(स्प्रिंगडेल)/पुवि/२०१५
दिनांक. 26 MAY 2015 – e369/68

प्रति,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे

**विषय :- प्राथमिक शाळेच्या स्थलांतरास परवानगीबाबत ...**
सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे स्प्रिंग डेल स्कुल, अंबडवेट ता. मुळशी जि. पुणे या प्राथमिक शाळेचे स.नं. १११/१ वारजे ता. हवेली जि. पुणे येथे केलेल्या स्थलांतरास कार्योत्तर मान्यता देण्याबाबत

**संदर्भ :- १)शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र-माशास्थ २०१२/(५९/१२) माशि-२ दिनांक ३१ जुलै २०१३.**
२) शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण १११४/प्र.क्र.१३०/एसएम-१/मंत्रालय मुंबई-३२ दि ०५.६.१४
३) शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प. पुणे यांचे पत्र क्र जिप/शिक्षण/खाप्राशा/९९१/१४ दि १६.०६.२०१४
४)या कार्यालयाचे पत्र जा.क्र. शिउसं/प्राथ-२/स्थलांतर/पुवि/२०१३-१४/१४९२७/२९ दि. २७.०६.२०१४
५)मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र प्राशास्थ ३११४/प्र.क्र.२७६/एसएम-१ मुंबई दि.१३.०१.१५.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे स्प्रिंग डेल स्कुल, अंबडवेट ता. मुळशी जि. पुणे या इंग्रजी माध्यमाच्या विना अनुदानित शाळेचे स.नं. १११/१, वारजे ता. हवेली जि. पुणे येथे स्थलांतराणाचा प्रस्ताव संदर्भ क्र-४ च्या पत्रान्वये सादर केलेला होतो.

सदर प्राथमिक शाळा भाडयाच्या इमारतीतुन संस्थेच्या मालकीच्या प्रशस्त इमारतीत स्थलांतरीत केली आहे. तसेच स्थलांतरीत ठिकाणी आरटीई-२००९ नुसार आवश्यक सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध केल्या असून विद्यार्थ्यांना जाण्यायेण्यासाठी बसची सुविधा उपलब्ध केली आहे. यास्तव शासन निर्णय दिनांक ३१.०७.२०१३ मधील अंतराची अट शिथिल करुन या शाळेच्या स्थलांतरास खाली नमुद अटी व शर्तीवर कार्योतर मान्यता शासन पत्र क्र-५ अन्वये देण्यात आलेली आहे.

१. स्थलांतरीत प्राथमिक शाळेतील कोणत्याही वर्गासाठी, कोणत्याही कारणास्तव सरासरी हजेरीची अट शिथिल केली जाणार नाही.
२. स्थलांतरास सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांची सहमती असावी. तसेच सर्व पात्रताधारक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना स्थलांतरित केलेल्या प्राथमिक शाळेच्या ठिकाणी सामावून घेतले असावे.
३. शासनाने वेळोवेळी निर्गमित होणारे सर्व नियमाचे पालन करणे संस्थेच्या प्राथमिक शाळेस बंधनकारक राहील.
४. स्थलंतरीत ठिकाणी आरटीई अॅक्ट-२००९ नुसार प्राथमिक शाळेसाठी आवश्यक जागा, फर्निचर, ग्रंथालय, खेळाचे मैदान, शैक्षणिक व भौतिक सुविधांची पुर्तता संस्थेने करणे आवश्यक राहील.
५. सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे स्प्रिंग डेल स्कूल, अंबडवेट, ता. मुळशी जि. पुणे या इंग्रजी माध्यमाच्या विना अनुदानित प्राथमिक शाळेस नियमानुसार मान्य पदावरील आरक्षणानुसार नियुक्त केलेले, क्षेत्रीय अधिका-यांची मान्यता असलेले सर्व अर्हता प्राप्त शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांना स्थलांतरित शाळेत सामावून घेण्यात यावे तसे हमीपत्र संस्थेकडुन रु. १००/- च्या बंधपत्रावर नोटोराईज्ड करुन घ्यावे.
६. स्थलांतरीत प्राथमिक शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी
७. प्रस्तावित ठिकाणी पटसंख्येअभावी अतिरिक्त शिक्षक झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संस्थेची राहील.
८. स्थलांतरीत शाळा मुळ ठिकाणी अनुदानाच्या ज्या तत्वावर होती, त्याच तत्वावर स्थलांतरीत ठिकाणी मंजुरी देण्यात यावी.
९. सदरहु स्थलांतरा संदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रीय अधिका-याकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप झाल्यास स्थलांतरणास देण्यात आलेली मंजुरी तात्काळ रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

सदरहु संस्थेच्या प्राथमिक शाळेच्या स्थलांतरास कार्योत्तर मान्यता देण्याबाबत आवश्यक पुढील कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास व या कार्यालयास कळविण्यात यावे.

RMD Sinhgad Spring Dale School
S.No. 111/1, Warje,Pune - 411 058.
Inward No.: 08
Date: 28/5/2015
Sign.:

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे.१.

प्रत माहितीसाठी सविनय सादर
१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.

प्रथम मान्यता

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक) 14
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ काविअ/14/2019
पुणे 1 दिनांक :- 7/1/2019

प्रति,

**अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,**

**सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसा संचलित आर.एम.डी सिंहगड स्प्रिंगडेल स्कूल,वारजे-111/1,मुंबई पुणे बंगलोर हायवे जवळ,जि.पुणे**

विषय:- सन 2015-16 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाब

संदर्भ 1. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र 1, 6 व 24) 2013

2.शासन निर्णय जा.क्र.678/प्राशि-3 , दि.18.8.2009

3.मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे जा.क्र.शिउस/प्राथ-2/काविअ/मान्यता दि.19.4.2010

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. 2 च्या निर्णयानुसार **खालील अटी व शर्तीवर विद्यमान प्राथमिक शाळेस प्राथ ते उच्चप्राथमिक इ. १ ली ते इ.७ वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे .**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 9 |
| 1 | सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसा. सिंहगड रोड,पुणे-51 संचलित | आर.एम.डी सिंहगड स्प्रिंगडेल स्कूल,वारजे-111/1,मुंबई पुणे बंगलोर हायवे जवळ,जि.पुणे | इंग्रजी | कायम विना अनुदानित तत्वावर | प्राथमिक ते उच्च प्राथमिक इ.१ली ते इ.७ वी | 2017 |

## अटी व शर्ती

1.संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

2.शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

3.या अधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.

4.संदर्भ क्रमांक 02 अन्वयेसन 2017-18 मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे. परवानगी मिळाल्या पासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

5.परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.

6 शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

7. शासन निर्णय जा.क्र.678/प्राशि-3 , दि.18.8.2009 तील अटी शर्तीतील मुददा क्र.2 चे कायम पूर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.

8. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)